Lalita Gandbhir
4200 North Ocean Dr.
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
First Time Serial Rights

# सहप्रवाशी

आमच्या घरामागे मोठ्ठं आठ एकराचं जितं जागतं पटांगण आहे. त्याच्या गोलाकार सरहद्दीलगत घरांची मागची अंगणं व टेनिस कोर्टस् आहेत. पटांगणाभोवती म्युनिसिपालिटीने लोखंडी जाळीचं वरती काटे असणारं कुंपण घातलेलं आहे. कुंपण ही ह्या पटांगणाची सरहद्द, असं मी मानते.

आमच्या घरासमोरच्या रस्त्यापासून एक अरुंद गवतामातीची सडक कुंपणापर्यंत जाते. ह्या एकाच सडकेवरून मोटार पटांगणात जाऊ शकते. इतर सर्व दिशानी येऊन पटांगणात विलीन होणारे मार्ग ह्या चिमुकल्या पायवाटा आहेत. या वेड्यावाकड्या वाटांवरून फक्त पायांची अथवा सायकलींची रहदारी असते. चिखल झाला किंवा स्नो पडला की फक्त पायच या वाटांवरून चालू शकतात.

आमच्या घरापासून अर्ध्या मैलावर एक तळं आहे. ह्या तळ्याभोवती जुन्या पद्धतीची घरं आहेत. तळ्याच्या किनाऱ्याचा एक भाग गावाने स्वतःसाठी म्हणून ठेवलेला आहे. . त्या भागात उन्हाळ्यात पोहण्याची व्यवस्था केलेली आहे. त्या तळ्याभोवती दोन ठिकाणी विश्रांती घेण्यासाठी म्हणून बाकडी ठेवलेली आहेत. तळ्याभोवती रस्त्यावर जुन्या पद्धतीचे गॅसचे दिवे मुद्दाम ठेवलेले आहेत.

पटांगण तर मला घराच्या खिडकीतून दिसतं. पण तळ्यावर सुद्धा निदान हवा चांगली असताना मी रोज फेरी मारायचा प्रयत्न करते.

या घरात आल्यापासून माझ्या नकळत मी पटांगणातल्या व तळ्यातल्या आणि त्याच्या आसपासच्या प्राणीजगताचं अवलोकन करते आहे.

ह्या प्राणीमात्रांच्या जगताचा सतत बदलत्या ऋतुंशी घनिष्ट संबंध आहे.

ह्या पटांगणावर व तळ्यात खेळ खेळणाऱ्या अनेक जीव जिवाणूंपैकी काही तिथेच राहतात. काही दिवसातून दोन तीनदा फेऱ्या मारतात. तर काही ऋतुंनुसार ये जा करतात. उन्हाळ्यात हे पटांगण हिरवंगार असतं. भवतालच्या

झाडांवर हिरवी पालवी असते. गवताला कुणी पाणी घालत नाही. दर चार पाच दिवसाने पडणाऱ्या पावसाच्या पाण्यावर ते तग धरून असत. एवढंच नव्हे तर बहुतेक दिवस हिरवंगार राहात.

उन्हाळा संपतो. रात्री थंडी पडू लागते. पानांचे रंग हळू हळू पिवळे, लाल होऊ लागतात. सूर्य लवकर मावळून उशीरा उगवू लागतो. हळू हळू दिवसाही थंडी पडू लागते. झाडं पानांच्या रंगाने पूर्ण बहरतात. ही झाडं व त्यांचे रंग सूर्यप्रकाशात झगमगतात. तळं संथ असलं की त्याला रंगीबेरंगी झाडांच्या प्रतिबिंबाची झालर लागते.

थंडी वाढत जाते. रंगीत पानं सुकून तपकिरी होतात. तळ्यावर अगणित पानं तरंगत असतात.

थंडी वाढत जाते आणि एक दिवस हिमवृष्टी होते. पटांगण, तळं, झाडं, घरं, रस्ते सगळ्यावरतीच पांढरं आच्छादन पडतं. चंद्रप्रकाश रात्री या आच्छादनांवरून परावर्तीत होतो व रात्री पटांगणावर व तळ्यावर पांढरट धूसर, गूढ उजेड पडतो. ह्या पांढऱ्या आच्छादनावर खारी, कुत्रे, पक्षी स्पष्ट दिसू लागतात.

हिवाळ्याच्या सुरुवातीला व अंताला हवा धड गरम नाही व धड थंड नाही अशी परिस्थिती असते तेव्हा बर्फमय पाऊस पडतो. हा पाऊस सर्व विश्वालाच काचेसारख्या आवरणाने मढवतो. सूर्यकिरणात हे आवरण स्फटिकासारखं चाकाकताना दिसतं. पण या आवरणावर कुणाला चालता येत नाही. माणसं व प्राणी घसरून पडत राहतात.

हवा गरम होते. तपकिरी गवत परत हिरवं होतं. झाडांवर पानांच्या कोवळया मिटलेल्या कळ्या येतात. काही झाडांना पांढरा, लालसर तांबडा असा नखशिखांत फुलोरा फुटतो. जमिनीतून छोटी छोटी फुलं डोकावू लागतात.

हळू हळू दिवस मोठा होतो व परत उन्हाळा येतो.

पटांगणातल्या गवताखाली असंख्य गांडुळं व गोगलगायी राहतात. मी जेव्हा स्प्रिंगमध्ये झाडं लावायला जमीन खणते तेव्हाच या गांडुळांचं अस्तित्व मला जाणवलं. ही गांडुळं पाहिली की भारतातून आलेली माणसं "गांडुळांची जमीन आहे ना, म्हणून सुपिक आहे. तुझ्या भाज्या, टोमॅटो किती छान येतात, ते या गांडुळांमुळेच." असं म्हणतात.

उन्हाळ्यात मधूनच अंगाची काहिली करणारे दिवस उगवतात. तेव्हा ही पडदाशिन असणारी गांडुळं आपण होऊन जमीनीबाहेर येतात. 'ती कां बाहेर पडतात?', याचा शोध मला अजूनही लागलेला नाही. "ओलावा हवा असला तर जमिनीत खोलवर जायला हवं" हे त्यांना का समजत नाही, ते मला माहित नाही. पण ती बाहेर पडतात हे खरं.

ती बाहेर पडतात त्या गांडुळांच्याच अंगाच्या गोलाई एवढं एक भोक जमीनीत पडलेलं असतं. त्या भोका भोवती गांडुळांनी उखणलेल्या मातीची गांडुळासारखीच एका स्प्रिंगच्या आकाराची गोल नळी होऊन पडलेली असते. ती ओलसर नळी व गांडुळं लगेच पटांगणातील हवेच्या उष्णते मुळे सुकू लागतात. मातीच्या नळीचा भुगा होतो. त्या जागी मातीचा छोटा ढीग उरतो. त्या मातीच्या ढिगाशेजारी ही गांडुळं तडफडून मरून पडतात. मग गांडुळांच्या शरीराची लांबोडकी नळी हळू हळू चपटी होते. या गांडुळांवर पाणी ओतून त्यांना जिवंत ठेवण्याचे माझे प्रयत्न कधीच यशस्वी झालेले नाहीत. गांडुळं (अथवा निसर्ग अथवा देवेच्छा) माझ्या प्रयत्नांना यश येऊ देत नाहीत.

अशी शेकडो गांडुळं दरवर्षी पटांगणात उन्हाने तपकीरी झालेल्या गवतावर सामुदायिक आत्महत्या करतात. ‘ह्या सामुदायिक आत्महत्यांमुळे गांडुळांची संख्या कमी होऊन माझी जमीन नापिक होईल’ ही माझी भीती आजवर खरी झालेली नाही. ही गांडुळं बहुतेक वृद्ध झालेली असावीत. म्हणून एक प्रकारचे उंदिर सामुदायिक आत्महत्या करतात तशी आत्महत्या ती करत असावीत, अशी मी कल्पना करते. पण मला अजून सत्य उलगडलेलं नाही. उलगडलेलं नाही.

छोट्या छोट्या गोगलगायी सुद्धा माझ्या मागच्या अंगणाच्या रहिवाशी आहेत. हिवाळ्यात त्या दिसत नाहीत. पण स्प्रिंगनंतर त्या झाडांच्या ओलसर बुंध्याना व बुध्यांच्या पायतळी असलेल्या झुडपांना चिकटून राहतात. त्या कुणाच्या अध्यात मध्यात नसतात. माझ्या झाडांच्या पिकलेल्या टोमॅटोंवर कधीतरी त्या मला सापडतात. तो टोमॅटो तोडून मी तो गोगलगायींनाच अर्पण करते. स्प्रिंगमध्ये दोन गोगलगायी मधून मधून एकमेकीला चिकटून पडलेल्या मला दिसतात. त्या दिवसेंदिवस तशाच पडलेल्या असतात. त्यांना रोज तशाच पाहून मी कंटाळते. ‘ही मगरमिठी सोडून कधी त्या वेगळ्या होणार’?, ते बघायचं विसरून जाते. त्या पायरीवर चिकटून पडलेल्या असल्या तर त्या दिवसभरात थोड्या सरकतात, हे मला त्यांच्या अंगावरच्या वाळलेल्या द्रवाची पायरीवर रुंद रेषा उमटते, त्या वरून समजतं.

पटांगणात खारी राहतात. संबंध उन्हाळा त्या तोंडात काही तरी भरून झाडांवरून व विजेच्या खांबांच्या तारांवरून धावपळ करतात. शेजारची मांजरं त्यांची शिकार करण्यासाठी सतत या खारींमागे धावत असतात. पण त्यांना या खारींना पकडण्यात क्वचितच यश येतं. या खारींची रात्रंदिवस चाललेली धावपळ पाहिली की मला लग्नघरात ‘आपण भयंकर कामात आहोत’ असं दाखवून उगाच धावपळ करणाऱ्या माणसांची आठवण येते.

पटांगणाच्या कडेला लहान काळ्या मुंग्या व डोंगळे यांची वारुळं आहेत. पाजवे उंदीरही या पटांगणाचे रहिवाशी आहेत. ह्यांची उपस्थिती ते घरात पाहुणे म्हणून आले की जाणवते. एरवी ते आपल्या दुनियेत स्वतंत्रपणे सुखाने राहतात. बहुतेक माणसं असे पाहुणे घरात आले की पेस्ट कंट्रोल करून त्यांना मारून टाकतात.

स्प्रिंगमध्ये असंख्य रंगीबेरंगी पक्षी हजारो मैल प्रवास करून पटांगणामधल्या त्यांच्या उन्हाळी घरांमध्ये परत येतात. सुतार पक्षी पहाटे पांच वाजता प्रचंड आवाजात ठकठक करून झाडात घर खोदतो. ‘तो दरवर्षी नवं घर कां खोदतो’? मला न उलगडलेलं कोडं आहे. त्याची ठकठक ही मी हिवाळा संपल्याची नांदी समजते.

ह्या पक्षांबरोबरच किंवा त्याच्या आधीच रॉबिन हा पक्षी येतो. त्या मागून ‘मॉकिंग बर्ड’ येतो. मॉकिंग बर्डचं भाषांतर मी नकल्या पक्षी असं करते. ते अगदी योग्यही आहे. कारण हा पक्षी इतर सर्व पक्षांचे आवाज काढतो. तो दिसला की शरद शिट्ट्या वाजवतो. हा नकल्या तशाच शिट्ट्या वाजवून प्रत्युत्तर देतो.

स्प्रिंगमध्ये हे पक्षी घरट्यात अंडी घालतात. त्यातली काही अंडी पडतात व झाडाखाली फुटलेली सापडतात. त्यात अनेकदा रॉबिनच्या निळ्या अंड्याचा समावेश असतो. त्या अंड्याकडे बघून, ह्या पक्षाला नीट घरटं बांधता येत नसावं किंवा त्याला स्वताच्या अंड्याची पर्वा नसावी, असे अशास्त्रीय अंदाज मी करीत असते. कधी अंड्यात बलक सापडतो. शेवटी छोटी छोटी पिल्लं सापडू लागतात.

ह्या पिल्लांना उबदार खोक्यात ठेवून, आपल्या तोंडात हॅमबर्गर घेऊन पक्षांप्रमाणे भरवण्याचे प्रयोग शरद व मुलं करत असत पण ती पिल्लं थोड्या तासातच मरून जात असत. शेवटी आम्ही इथल्या पक्षीप्रेमी ऑडॉबॉन सोसायटीला फोन करून सल्ला मागितला. “पिल्लांना ती सापडतील तिथेच असू द्या. त्यांचं मांजरापासून रक्षण करा. ह्या पिल्लांना भरवून जगवणं पक्षांनाच जमतं. त्यांचे आई वडील त्यांना उचलून नेतात.” असा सल्ला दिला.

आता आम्ही ह्या पिल्लांच्या वाटेला जात नाही. शक्य झाल्यास त्यांचं मांजरांपासून रक्षण करतो. अजूनही ‘आपल्या जमिनीवर पडलेल्या पिल्लाला पक्षी उचलून नेत आहेत’, हे दृश्य माझ्या दृष्टीला पडलेलं नाही.

स्प्रिंगमध्ये पाऊस पडला व बर्फ वितळला की पटांगणात पाणी साचतं. जमिनीतलं पाणी किंवा जमिनच गोठलेली असल्याने हे पाणी जमिनीत मुरत नाही. परिणामी पटांगणात तळच होतं. ते पटांगण एकेकाळी तळच होतं, असं म्हणतात. आता असं तळं बुजवणं शक्य नाही. पण कुणा एका काळी निसर्ग मुबलक होता व लोकांना तळ्याची पर्वा नव्हती तेव्हा हे तळं मालकाने बुजवलं व गावाला ‘मुलांचं पटांगण’ म्हणून बक्षीस दिलं.

लगेच कुठून तरी पांढरे सी गल्स उगवतात. आपल्या आगमनाची कर्कश ललकारी मारत दवंडी पिटवतात. तात्पुरत्या तळ्यावर ते गोल गोल फिरत सुरकांड्या मारून तळ्यात कसली तरी शिकार करतात. ‘ते काय पकडतात’? ह्याचं गूढ मी अजूनी सोडवलं नाही. त्या तळ्यात माशाची व्युत्पत्ती झाली आहे का, हे मी पुष्कळदा तळ्यात डोकावून व त्यात थबक् थबक् चालूनही पाहिलं आहे. पण मला मासे काही दिसले नाहीत.

हवा गरम होऊ लागते तसं तळं आटू लागतं. त्याचा आकार संकुचित होतो. आटल्या तळ्याबरोबर सी गल्सची संख्याही आटू लागते. शेवटी पटांगणात एक डबकं उरतं. ते आटलं की हे पांढरे पाहुणे गायब होतात.

अंडी घालून साधारण तीन महिने झाले की पक्षांच्या पिल्लांचा कोलाहल वाढू लागतो असा माझा अनुभव आहे. मला शोध लागला की साधारण ह्या सुमारास ‘आईवडील पिल्लं स्वतंत्र राहाण्याच्या वयाची झाली आहेत’ असं ठरवून त्यांना आयतं जेवण भरवणं बंद करतात. ह्या आयतोबा पिल्लांना भूक लागली की ती कलकलाट करून आईवडिल आपल्याला भरवत नाहीत म्हणून तक्रार करतात. आईवडिल बधतच नाहीत असं पाहिलं की ही पिल्लं मग हळू हळू शंख आवरून ‘स्वताच्या पोटापाण्याची व्यवस्था स्वताच करायला हवी’ हे कटू सत्य ओळखतात. मग त्यांची ओरड कमी होते.

सप्टेंबरमध्ये जगाचा हा भाग सोडून थंडीआधी गरम प्रदेशात जाण्याची पक्षांची वेळ येते. त्यावेळी मग पक्षांचे थवे आकाशात उडताना दिसू लागतात. हे पक्षी मोठ्या गोलाकार थव्यात किंवा बहुतेक इंग्लिश V आकाराच्या ओळी करून उडतात. असे मोठे वाइल्ड गीज पंख चंद्रप्रकाशात चकचकत असताना V आकारात उडू लागले की आपण एखाद्या जादुने भरलेल्या जगातलं दृश्य पाहतो आहोत असं मला वाटू लागलं. हे दृश्य ‘साऊंड ऑफ म्युझिक’ मधल्या ‘माय फेवरिट थिंग्स’या गाण्यात (‘वाइल्ड गीज दॅट फ्लाय वुइथ मून ऑन देअर विंग्स’) अजरामर केलेलंच आहे. काळ्या ब्लॅकबर्डसचे थवेच्या थवे वाटेत झाडाच्या फांद्यावर विश्रांतीसाठी उतरतात. त्यांच्या कलकलाटाने सारं आसमंत भरून जातो. असे पक्षी दिसले की शरद त्या झाडाखाली उभं राहून टाळी वाजवतो. शेकडो पक्षी मग झाडातून उडून आसपास विखरतात.

हळूहळू सगळे पक्षी जातात. मग उरतात त्या फक्त चिमण्या. ह्या चिमण्या इथे वर्षभर राहतात. बर्फ पडला, तापमान खूप थंड झालं तर त्या वळचणीच्या खालची किंवा इतर त्यातल्या त्यात उबदार जागा शोधतात. त्यांच्यासाठी काही माणसं बर्फात दाणे टाकतात.

पटांगणात तळं झालेलं असलं की सहसा कुणी माणसं तिथे फिरकत नाहीत. पण पाणी थोडं वाळून दलदल झाली की त्या दलदलीत कुत्र्याला फिरायला नेणारे काही रांगडे शूरवीर आमच्या गावात आहेत. ते गुडघ्यापर्यंत रबरी शूज घालून पटांगणात जातात व कुत्र्यांना चिखलात मुक्त सोडतात. कुत्री मग चिखलमय होतात. मधूनच या कुत्र्यांचं भांडण लागतं. मग मालक मध्ये पडून स्वताही चिखलमय होतात.

त्या तळ्यात व चिखलात काही मुलंही कडमडायला जातात व नखशिखांत चिखलमय होऊन घरी येऊन ओरडून घेतात.

जसजसा चिखल वाळतो तसतशी माणसांची रहदारी वाढते. कुत्र्यांचे मालक आपल्या कुत्र्यांना तिथे फिरायला आणू लागतात. कुत्री पटांगणातल्या कडेच्या झाडांचा उपयोग करून झाडांना खत पुरवतात. एकाच वेळी अनेक कुत्री तिथे मुक्त असली तर त्यांच्या भांडणांना ऊत येतो. मालक धापा टाकत त्यांचं भांडण सोडवण्याचा प्रयत्न करतात.

मग एक दिवस म्युनिसिपालटीची गाडी येते व ती पटांगणात रेघा मारते. ह्या पांढऱ्या रेघा बेसबॉल व सॉकर या खेळांसाठी मारलेल्या असतात. भावी खेळांची ती नांदी असते.

वय वर्षे चार ते सोळा पर्यंतच्या मुलांच्या टीम्स. तिथे सॉकर व बेसबॉल खेळायला सुरुवात करतात.

रंगीबेरंगी युनिफॉर्म घातलेली मुलं व त्यांचे आईवडिल यांच्या आवाजाने पटांगण दुमदुमू लागतं. हा कलकलाट स्प्रिंग व फॉलचे तीन महिने चालू असतो. भारतातून आलेले पाहुणे ह्या कलकलाटाने खूष होतात. “अमेरिकेत सगळीकडे जीवघेणी शांतता असते, पण तुमच्याकडे आल्यावर कसं माणसात आल्यासारखं वाटतं”, असं म्हणतात.

नंतर उन्हाळा येतो. मध्यमवयीन हौशी खेळाडू, मुलांनी स्वता जमवलेले खेळ व पतंग ह्यांना ऊत येतो. पटांगण दुमदुमत नसलं तरी जागृत राहतं.

नंतर फॉल येतो. सॉकर, बेसबॉल हे खेळ नवे गडी परत खेळू लागतात.

पटांगणाच्या आयुष्याचं चक्र चालू राहतं.

गेली चार पाच वर्षं तळ्याच्या आयुष्यात एक अजब घटना घडली.

कनेडियन गीज हा एक मोठ्ठा बदकाच्याही दुप्पट रुंदीउंचीचा पक्षी आहे. ह्या पक्षांचा एक थवा दर वर्षी तळ्यात थोडे दिवस थंड ते उष्ण प्रदेशात येता जाता वस्तीला येत असे. दरवर्षी मी स्प्रिंग व फॉलमध्ये त्याचा इंतजार करीत असे.

गेली पाच वर्षं ह्या पक्षांनी कायमच चिमुकल्या तळ्यात बिऱ्हाड करायचं असं ठरवलं. आणि त्या तळ्यातील प्राणमात्रांचं समतोल जीवन संपुष्टात आला.

ह्या तळ्यात नेहमी दहा बारा बदकं व येणारे जाणारे सी गल्स व कॅनेडियन गीज वस्तीला असत. दहा बारा बदकात वीस बावीस कॅनेडियन गीजची भर पडताच एक मोठ्ठी भानगड निर्माण झाली.

लहान मुलं बदकांना खाण्यास पावाचे तुकडे घालत असत. बदक (आपल्या घरी आलेल्या पाहुण्यांप्रमाणे) नको नको म्हणत दोन तीन तुकडे खात असत. त्या तुकड्यांसाठी बदकात मारामारी झालेली मला आठवत नाही.

गीज येता जात राहायला येत असत तेव्हा ते रानटी होते. ते माणसाच्या आसपास फिरकत नसत. माणसं जवळ आली तर ते दूर जात. हे तात्पुरते तळ्यात राहणारे गीज नेहमी तळ्याच्या मध्यावर तरंगायचे.

ते कायमचे राहू लागताच ते माणसाळले. पावासाठी पुढे पुढे येऊ लागले. हळू हळू ते आक्रमक झाले. बदकांना ते पाव मिळूच देत नसत. येवढंच नव्हे तर पावासाठी ते माणसांनाही चोची मारू लागले. त्यातल्या दोन गीजच्या गळ्यात तर चक्क कुणी तरी ‘आय पेक’ अशी  पाटी बांधली.

या गीजच्या विष्ठेने किनारा, भोवतालची हिरवळ, घरांची अंगणं व रस्ता अस्वच्छ झाला. ‘पाणीही अशुद्ध होतं व त्यात माणसांनी पोहोणं योग्य नाही.’ अशाही शंका निर्माण होऊ लागल्या. शेवटी ‘त्या गीजची उचलबांगडी करावी’ यापासून  ‘त्यांना मारून टाकावं’ इथपर्यंत सूचना कानावर येऊ लागल्या.

हे भांडण चार पाच वर्षे चालू राहिलं. ही चार पाच वर्षं हिवाळा नेहमीपेक्षा गरम हवामानाचा होता. ‘ग्रीन हाऊस इफेक्ट’मुळे गीज गोंधळले आहेत’, असंही मत प्रदर्शित झालं.

मी ठरवलं की ‘ते आळशी झाले आहेत’. हजारो मैल उडायचा त्यांना कंटाळा येतोय.

ते तळं हे जगाची प्रतिकृतीच असं मला वाटू लागलं.

गेल्या वर्षी एकदम कडक हिवाळा पडला आणि या वर्षी गीज बेपत्ता झाले.

तळ्याभोवतालचा भाग आता स्वच्छ आहे. गीज पाहुणे म्हणूनच येऊ देत अशी मी प्रार्थना करतेय.

ह्या गीजच्या उदाहरणावरून मी बरंच काही शिकले.

निसर्ग व प्राणी यांच्यातला समतोल नष्ट झाला की बरंच काही बिघडतं.

आता बदकं परत माननीय पाहुण्यांसारखी हळूच पुढे येऊन थोडासा पाव खातात.

ह्या पटांगणातील व तळ्यातील जीवजिवाणुंच्या जीवनात माझ्या नकळत माझ्याही जीवनाचा धागा गुंतला गेलेला आहे. कोण जाणे ह्या पशुपक्ष्यांच्या मनात काय असतं ? दरवर्षी येता जाता ते कदाचित माझ्या खिडकीत डोकावून ‘ही बाई अजूनही ह्या घरात राहाते कां ?’ असा विचार करत असतील.

त्यांच्या साथसंगतीमुळे मला एकटेपणा वाटत नाही.

नाही तरी ते, मी, आपण सर्वच या जगात सहप्रवाशी आहोत व सर्व विश्वाचा टिंबायेवढा का होईना भाग आहोत.

समाप्त

**- ललिता गंडभीर**